शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शिवसेना रस्त्यावर >> पान 2

पंजाबरावांचा हवामान अंदाज पुन्हा खरा ठरला >> पान 3

अब तुम्हारे हवाले वतन साथीयो... देशसेवा करताना दिपज्योत मालवली >> पान 4


# दैनिक आपला विदर्भ


**सुविचार**

चुकतो तो माणूस
आणि चुका सुधारतो तो देवमाणूस !

त्या दोन सुपरस्टारपासून प्रेरित आहे श्रद्धा कपूर
आतील पान



apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 50 ■ गुरुवार, दि. 26 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज महाराष्ट्र दौऱ्यावर

## पायाभरणीसह २२ हजार ६०० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचे राष्ट्रार्पण



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी २६ सप्टेंबर रोजी पुणे जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. यावेळी प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन तसेच २२ हजार ६०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचे राष्ट्रार्पण करतील.

जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या पुणे मेट्रो विभागाच्या उद्घाटनामुळे पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण होणार आहे. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट दरम्यानच्या भूमिगत विभागाचा खर्च सुमारे १ हजार ८१० कोटी रुपये आहे.

याशिवाय सुमारे २,९५० कोटी रुपये खर्चून विकसित केल्या जाणाऱ्या पुणे मेट्रो फेज-१ च्या स्वारगेट-कात्रज विस्ताराची पायाभरणीही पंतप्रधान करणार आहेत. मार्केट यार्ड, पद्मावती आणि कात्रज या तीन स्थानकांसह सुमारे ५.४६ कि. मी. चा हा दक्षिणेकडील विस्तार पूर्णपणे भूमिगत आहे.

प्रधानमंत्री भिडेवाडा येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पहिल्या मुलींच्या शाळेच्या स्मारकाची पायाभरणी करतील.

सुपरकंप्युटिंग तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताला स्वावलंबी बनवण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेच्या अनुषंगाने, प्रधानमंत्री तीन परम रुद्र सुपरकंप्युटर राष्ट्राला समर्पित करतील, ज्यांची किंमत सुमारे १३० कोटी रुपये आहे. अग्रगण्य वैज्ञानिक संशोधन सुलभ करण्यासाठी हे सुपरकंप्युटर पुणे, दिल्ली आणि कोलकाता येथे तैनात करण्यात आले आहेत. पुण्यातील विशाल मीटर रेडिओ दुर्बिणी (जीएमआरटी) फास्ट रेडिओ बर्स्ट्स (FRBs) जलद रेडिओ स्फोट (एफआरबी) आणि इतर खगोलशास्त्रीय घटनांचा शोध घेण्यासाठी सुपर कॉम्प्युटरचा लाभ घेईल. दिल्लीतील इंटर युनिव्हर्सिटी एक्सेलरेटर सेंटर (आययूएसी) भौतिक विज्ञान आणि अणु भौतिकशास्त्र यासारख्या क्षेत्रात संशोधन वाढवेल. कोलकाता येथील एस. एन. बोस केंद्र भौतिकशास्त्र आणि पृथ्वी विज्ञान यासारख्या क्षेत्रात प्रगत संशोधन करेल.

हवामान आणि हवामान संशोधनासाठी तयार केलेल्या उच्च-कार्यक्षमता संगणकीय (एचपीसी) प्रणालीचेही प्रधानमंत्री उद्घाटन करतील. या प्रकल्पात ८५० कोटी रुपयांची गुंतवणूक आहे. हवामानविषयक अनुप्रयोगांसाठी भारताच्या संगणकीय क्षमतेत लक्षणीय झेप म्हणून चिन्हांकित करते. पुण्यातील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटेरोलॉजी (आयआयटीएम) आणि नोएडातील नॅशनल सेंटर फॉर मीडियम रेंज वेदर फोरकास्ट (एनसीएमआरडब्ल्यूएफ) या दोन प्रमुख ठिकाणी असलेल्या या एचपीसी प्रणालीमध्ये विलक्षण संगणकीय शक्ती आहे. नवीन एचपीसी प्रणालींना 'अर्क' आणि 'अरुणिका' अशी नावे >> पान २

# डॉ. ऋतुजा चव्हाण यांचा मेहकर लोणार मतदारसंघातून निवडणूक लढण्याचा निर्धार!



दैनिक आपला विदर्भ


**मेहकर/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात विधानसभेचा बिगुल वाजताच सर्वच प्रमुख पक्ष विधानसभेच्या तयारीला लागले आहेत. यातच नवीनवीन समीकरणेही महाराष्ट्रात पाहायला मिळत आहे. बच्चू कडू यांची ' परिवर्तन महाशक्ती ' असो किंवा रविकांत तुपकर यांची ' महाराष्ट्र क्रांतिकारी आघाडी ' असो प्रत्येकजन महाराष्ट्रातील परिवर्तनाविषयी उत्सुक आहेत. अशातच मेहकर मतदार संघातून डॉक्टर ऋतुजा ऋशांक चव्हाण हे नाव प्रामुख्याने समोर येतं आहे. पेशाने डॉक्टर असलेल्या ऋतुजा चव्हाण यांना महाराष्ट्रातील आर्थिक विषमतेची दरी तसेच शेतकरी, कष्टकरी या सर्व घटकांना एकसंध करून विकासाच्या प्रवाहात आणण्याची आवश्यकता अधोरेखित करून दाखवली आहे. मध्यंतरीत त्यांच्या विकासाच्या ' ब्लु प्रिंट ' ने सर्वांच लक्ष वेधून घेतलं आहे.

राजमाता जिजाऊ सामाजिक फाउंडेशनच्या अध्यक्षा ऋतुजा चव्हाण यांच्या पार्श्र्वभूमीबद्दल पाहिल्यास मतदार संघातील मराठा, मुस्लिम, ओबीसी तसेच मागासवर्गीय या सर्वांच्या मतांची गोळाबेरीज केल्यास मेहकर लोणार मतदार संघात प्रत्येका विरुद्ध त्या कडवं आव्हान निर्माण करतील यात जराही शंका नाही. राजमाता जिजाऊ सामाजिक फाऊंडेशनच्या माध्यमातून त्या समाजातील तळागाळातील जनतेपर्यंत पोहचल्या आहे. मेहकर लोणार संघात त्यांनी अपक्ष जरी विधानसभेत लढण्याची तयारी दर्शवली तरी मेहकर लोणार मतदार संघातील त्यांचा दांडगा संपर्क, समाजकार्याची तीव्र इच्छा आणि ज्ञानस्वी वलय यामुळे त्यांना मानणारा विशिष्ट वर्ग तयार झाला आहे. त्यामुळे हा विशिष्ट निवडणुकीत आपली चोख भूमिका बजावेल. अशातच प्रसारमाध्यमांशी बोलतांना त्या म्हणाल्या निवडणूका हे लोकशाहीचं सर्वात मोठं अस्त्र आहे. प्रत्येक पाच वर्षांनंतर होणाऱ्या निवडणुका परिवर्तनाचं सर्वात सशक्त माध्यम आहे कारण प्रश्र्न फक्त पाच वर्षांचा नाही तर येणाऱ्या पिढ्यांचा आहे.

मागील काही महिन्यांचा आढावा घेतल्यास डॉक्टर ऋतुजा चव्हाण यांच्या कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी, जनसामान्यांचा मिळणारा पाठिंबा, उच्च शिक्षित म्हणून युवाशक्तिमध्ये निर्माण झालेली क्रेझ या सर्वांचा विचार केल्यास डॉक्टर ऋतुजा चव्हाण यांनी मेहकर लोणार मतदार संघातून निवडणूक लढण्याची खुणगाठ बांधली आहे. ' कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढवूच ' असा त्यांचा एकूणच पवित्रा आहे. परिवर्तनासाठी केलेला निर्धार , मतदारसंघातील लोकांचा पाठिंबा यामुळे डॉक्टर ऋतुजा चव्हाण मतदार संघात मोठा उलटफेर करतील अशी चर्चा आहे.

# ठरलं! महायुतीच्या उमेदवारांची पहिली यादी नवरात्रीत येणार

## मात्र ९० जागांवर तिढा कायम



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर असलेले भाजपचे चाणक्य अमित शाह यांची मंगळवारी महायुतीची बैठक पार पडली. या बैठकीनंतर अद्याप ९० विधानसभा जागांवर तिढा असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. जागावाटपासंदर्भात महायुतीची लवकरच दिल्लीत बैठक होणार आहे. महायुतीच्या उमेदवारांची पहिली यादी नवरात्रीत येण्याची शक्यता आहे. अमित शाहा यांनी तिढा असणाऱ्या जागांवर दोन दिवसात मिटींग करून तीन पक्षाचे नेते तोडगा काढावा अशा सूचना केल्या आहेत. उद्याच महायुतीच्या नेत्यांची पुन्हा बैठक पार पडणार आहे.

विद्यमान आमदारांच्या जागा या त्या-त्या पक्षातील विद्यमान आमदारांना देण्यात येतील. तसेच जिथ भाजपाचा आमदार कमकुवत असेल अशा जागा महायुतीतील अजित पवार एनसीपी आणि एकनाथ शिंदे शिवसेना यांना प्राधान्य असेल.

महायुतीच्या नेत्यांची उद्या मुंबईत पुन्हा बैठक होणार आहे. अमित शहा यांच्यासोबत चर्चा झाल्यानंतर ज्या जागांबाबत अजूनही निर्णय झालेला नाही. त्या जागांबाबत उद्या पुन्हा एकदा महायुतीच्या बैठकीत तिन्ही पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत चर्चा होणार आहे. बैठकीची वेळ अद्याप ठरलेली नाही. बैठकीला भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित राहतील.

भाजप पदाधिकाऱ्यांना जिंकण्याचा कानमंत्र दिलाय. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ठाकरे, शरद पवार >> पान २




# मनोज जरांगे यांचे उपोषण ९ व्या दिवशी स्थगित



## मराठ्यांना त्रास देणाऱ्यांना सरळ करण्याचा इशारा; नेत्यांच्या सभेला न जाण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांनी नवव्या दिवशी त्यांचं उपोषण थांबवलं आहे. त्यांची तब्येत खालावल्याने त्यांनी उपोषण स्थगित करावं अशी मागणी अंतरवाली सराटीमध्ये जमलेल्या मराठा बांधवांनी केली होती. त्यानंतर आत मनोज जरांगे यांनी त्यांचं आंदोलन स्थगित केलं. अंतरवालीमध्ये जमलेल्या महिला आणि बांधवांच्या हस्ते पाणी पिऊन जरांगेंनी हे आंदोलन स्थगित केलं. मनोज जरांगे यांच्यावर आता छत्रपती संभाजीनगरमधील रुग्णालयात उपचार केले जाणार आहेत.

मराठा समाजाला आरक्षण मिळावं यासाठी गेल्या नऊ दिवसांपासून मनोज जरांगे त्यांच्या अंतरवाली सराटीत आंदोलनासाठी बसले होते. >> पान २

# बी. ए. एम. एस. डॉक्टर आता कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून होणार रुजू

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्याच्या आरोग्य विभागाला दिले होते निर्देश; २४ सप्टेंबरला निघाला शासन निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट ब या संवर्गातील रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत रिक्त जागेवर बी ए एम एस अहर्ताधारकांना कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती देण्याचे निर्देश केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्य सरकारच्या आरोग्य विभागाला दिले होते त्या निर्देशानुसार २४ सप्टेंबरला आरोग्य विभागाने शासन निर्णय निर्गमित केला आहे त्यामुळे आता बी ए एम एस डॉक्टरांना कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती मिळणार आहे



राज्यातील उपजिल्हा रुग्णालय ग्रामीण रुग्णालय , प्राथमिक आरोग्य केंद्र , फिरती दवाखाने यामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट ब या संवर्गातील पद रिक्त आहेत .त्याचा परिणाम आरोग्य सेवेवर होत आहे त्यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट ब या संवर्गातील रिक्त पदांवर नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत रिक्त जागेवर बी ए एम एस अहर्ताधारकांना कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती देण्याचे निर्देश केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी राज्य सरकारच्या आरोग्य विभागाला दिले होते संदर्भातील शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने २४ सप्टेंबरला निर्गमित करण्यात आला आहे या शासन निर्णयामुळे आता बी ए एम एस डॉक्टरांना कंत्राटी पद्धतीने वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवेत घेता येणार आहे त्यामुळे आयुर्वेदिक / लोपथिक दवाखाने प्राथमिक आरोग्य पथके / फिरती पथके ,जिल्हा परिषदेची दवाखाने उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय येथील रिक्त पदांवर बी ए एम एस अहर्ता धारकांना आता कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती मिळणार आहे . राज्य शासनाच्या या निर्णयामुळे प्रत्येक रुग्णालयाला आता वैद्यकीय अधिकारी मिळणार आहे तसेच प्रशासकीय कामकाजावरील ताण कमी होऊन आरोग्य सेवा अधिक सक्षम होणार आहे . हा शासन निर्णय सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याचं हित जोपासून तत्पर आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणारा आहे अशी प्रतिक्रिया आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली आहे

## सदाबहार अभिनेते; देव आनंद

हिंदी चित्रपट सृष्टीतील सदाबहार, चिरतरुण आणि चॉकलेट हिरो असे ज्यांचे वर्णन केले जायचे ते जेष्ठ सिनेअभिनेते दिवंगत देव आनंद यांची आज १०१ वि जयंती. १०१ वर्षांपुर्वी अजच्याच दिवशी म्हणजे २६ सप्टेंबर १९२३ रोजी त्यांचा जन्म झाला. हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. देव आनंद यांचे मूळ नाव देवदत्त पिशोरीमल आनंद असे होते. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. लाहोरमधील कॉलेजमध्ये १९४२ साली त्यांनी संगीतात ग्रॅज्युएशन पूर्ण केले. तिथेच त्यांची खुशवंत सिंग व बलराज साहनी यासारख्या दिग्गज व्यक्तिमत्वाशी भेट झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी काहीकाळ नोकरीही केली मात्र नोकरीत त्यांचे मन रमले नाही. लवकरच त्यांनी नोकरी सोडून चित्रपटाची वाट धरली. प्रभात कंपनीच्या हम एक है या चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. मात्र त्यानंतर त्यांचे काही चित्रपट आपटले. त्यांच्याच कंपनीचा म्हणजे नवकेतनचा अफसर हा चित्रपट देखील पडला मात्र या अपयशाने ते डगमगले नाही. अपना भी टाइम आयेगा.... असे ते त्यावेळी निर्मात्यांना म्हणत असत त्यांनी अभिनय केलेला बाजी हा चित्रपट पडद्यावर आला आणि त्यांचे हे बोल खरे ठरले. बाजी हा चित्रपट तिकीट बारीवर यशस्वी ठरला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली या चित्रपटाने त्यांना नायक म्हणून मान्यता दिली. या चित्रपटानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. केसांचा तुरा, गुलछबू आणि देखणी चेहरेपट्टी यामुळे उठून दिसणाऱ्या व्यक्तिमत्त्वाने प्रेक्षकांच्या हृदयात स्थान मिळवले. ते प्रेक्षकांचे आवडते नायक बनले. त्यांचे सर्व चित्रपट हिट होऊ लागले. बाजी, मुनीमजी, दुष्मन, कालाबाजार, सीआयडी, पेईंग गेस्ट, गॅम्बलर , तेरे घर के सामने, काला पाणी, जाल, गाईड, तेरे घर के सामने, छुपा रुस्तम, हरे रामा हरे कृष्णा, हिरा पन्ना, देस परदेस, ज्वेल थिप, जॉनी मेरा नाम, अव्वल नंबर, स्वामी दादा असे त्यांचे सर्वच चित्रपट यशस्वी ठरले. १९५० ते १९७० असे जवळपास दोन दशके त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवले. राज कपूर आणि दिलीप कुमार यांच्यासारख्या तगड्या नायकांसमोर त्यांनी मोठे आव्हान उभे केले. त्याकाळात या तिघांना हिंदी चित्रपट सृष्टीतील त्रिदेव असे म्हंटले जायचे कारण या तिघांनी तो काळ अक्षरशः गाजवून सोडला होता. देव आनंद आणि राज कपूर यांच्यापेक्षा देव आनंद यांचे चाहते अधिक होते विशेषतः त्या काळातील तरुणाईने त्यांना डोक्यावर घेतले होते. त्यांचा चित्रपट फर्स्ट डे फर्स्ट शो पाहण्यासाठी तरुण कॉलेज सोडून चित्रपट गृहाबाहेर रांगेत उभे असायचे. तरुण मुली तर त्यांच्यासाठी अक्षरशः वेड्या झाल्या होत्या. त्यांची एक झलक पाहण्यासाठी मुली घरातून पळून मुंबईला येत असत. त्यांच्या यशात त्यांच्या गाण्यांचा देखील खूप मोठा वाटा आहे. त्यांच्या बहुतेक चित्रपटाला सचिन देव बर्मन यांचे संगीत लाभले. सदाबहार गायक किशोर कुमार हे त्यांच्यासाठी गाणी गात. संगीतकार सचिन देव बर्मन, गायक किशोर कुमार आणि पडद्यावरील नायक देव आनंद हे त्रिकुट असे काही जमले की त्यांच्या अनेक गाण्यांनी इतिहास घडवला. तू कहा ये बता, देखो रुठो ना करो, एक घर बनाएंगे तेरे घर के सामने, दिल का भवर करे रे पुकार, गाता रहे मेरा दिल, मै जिंदगी का साथ निभाता चला गया, चुडी नही मेरा दिल दिल है दिल, फुलो का तारों का सबका कहना है, दिन ढल जाये, छोड दो आंचल जमाना क्या कहेगा यासारखी त्यांची असंख्य गाणी आजही लोकप्रिय आहेत. आजही ही गाणी आवर्जुन ऐकली जातात. देव आनंद यांनी केवळ चित्रपटात अभिनयच केला असे नव्हे तर त्यांनी काही चित्रपटांसाठी पटकथा लेखन केले तर काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले. आंधिया, हरे रामा हरे कृष्णा, हम नौजवान, अव्वल नंबर, प्यार का तराना, गँगस्टर, मै सोलह बरस की, सेन्सॉर या चित्रपटासाठी त्यांनी पटकथा लेखन केले तर हिरा पन्ना, देस परदेस, लूटमार, स्वामी दादा, सच्चे का बोलबाला, अव्वल नंबर अशा काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. अभिनयासाठी त्यांना अनेक फिल्मफेअर पुरस्कार तर मिळालेच पण भारत सरकार कडूनही त्यांना मानाचा पद्मभूषण पुरस्कार मिळाला. चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार समजला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कारही त्यांना मिळाला. ३ डिसेंबर २०११ रोजी त्यांचे निधन झाले. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने चित्रपट रसिकांच्या मनावर मोहिनी घालणाऱ्या या सदाबहार अभिनेत्याला त्याच्या १०१ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

## त्या दोन सुपरस्टारपासून प्रेरित आहे श्रद्धा कपूर

श्रद्धा कपूरचा 'स्त्री २' हा देशातील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. हा चित्रपट १५ ऑगस्ट रोजी प्रदर्शित झाला, ज्यादरम्यान 'खेल-खेल में' आणि 'वेदा' देखील प्रदर्शित झाले होते. या तिघांच्याही कामगिरीत 'स्त्री २'ने सुरुवातीलाच दोघांनाही मागे टाकले होते. सध्या श्रद्धा आणि 'स्त्री २'ची संपूर्ण टीम या यशाचा आनंद घेत आहे. या चित्रपटातील श्रद्धाच्या अभिनयाचे खूप कौतुक होत आहे. अलीकडेच श्रध्दा कपूरला फेमिनाच्या कव्हर स्टोरीवर दाखवण्यात आले होते, जिथे तिने चित्रपटाच्या यशाबद्दल तिला कसे वाटते आणि आनंद मिळत आहे हे सांगितले.

फेमिनासोबतच्या संवादादरम्यान श्रद्धाने सांगितले की, तिचे कुटुंब आणि तिची माणसे तिच्यासाठी किती महत्त्वाची आहेत. यशाबद्दल बोलताना श्रद्धा म्हणाली, माझ्यासाठी हे यश कोणतेही मोजमाप दर्शवत नाही. त्यापेक्षा मी आत्ता तुमच्याशी बोलत आहे तेव्हा चांगलं आणि चविष्ट जेवणाचा आस्वाद घेणे, माझ्या कुटुंबासोबत काही हालचाल करताना आनंदी राहणे आणि काही नाती घट्ट करणे हा माझा उद्देश आहे. माझ्यासाठी खरे यश म्हणजे तुमच्या आजूबाजूला तुमचे लोक असणे, पुरेशी झोप घेणे, तुमच्या कामात पूर्णपणे यशस्वी होणे, तुमचे जीवन संतुलित असणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुमची मानसिक शांती.मी नेहमीच माझे वडील आणि मावशी यांना त्यांच्या कामासाठी पूर्णपणे समर्पित केलेले पाहिले आहे आणि तरीही ते समाधानी नाहीत, या गोष्टी मला खूप प्रेरणा देतात.

त्यांच्या पिढीतील लोक ज्या प्रकारे त्यांच्या करिअरसाठी कठोर परिश्रम करतात आणि ते ज्या प्रकारची वचनबद्धता देतात. मी त्याची स्तुती करते.

# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शिवसेना रस्त्यावर

## शिवसेना नेते सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात मेहकरात ३ ऑक्टोबर रोजी भव्य परिवर्तन मोर्चा

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** शासनाच्या तुघलकी निर्णयाविरोधात शेतकर्यांच्या विविध मागण्यांसाठी विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, संपर्क प्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, उपजिल्हा प्रमुख प्रा. आशिष रहाटे, जिल्हा संघटक यांच्यासह पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना नेते सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात मेहकरात दि.३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता भव्य परिवर्तन मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिवर्तन मोर्चाला मेहकर येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे संपर्क कार्यालय जानेफळ रोड येथून प्रारंभ होणार आहे.तरी मेहकर मतदार संघासह जिल्ह्यातील शिवसैनिक व मतदारांनी मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, शेतकऱ्यांच्या सोयाबीनला प्रती क्विंटल ८ हजार रुपये भाव द्यावा, कपाशी व तुरीला १२ हजार रुपये प्रति क्विंटल भाव द्यावा, मेहकरातील एमआयडीसीचा प्रश्न मार्गी लावून बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध करून द्याव्यात, शेतकऱ्यांना तात्काळ पीक विम्याचा लाभ त्यांच्या खात्यात जमा करावा, शेतीला पाणी देण्यासाठी दिवसा १२ तास विजपुरवठा करावा, घरकुल योजनेचे पात्र



लाभार्थ्यांना तात्काळ लाभ द्यावा, जागतिक पर्यटन स्थळ असलेल्या लोणार विकास आराखड्याची रखडलेली कामे त्वरित पूर्ण करावे, महिलांना सुरक्षा देऊन त्यांचे सक्षमीकरण करावे, बेरोजगारांना न्याय द्यावा, मंजूर घरकुलाचें थकीत अनुदान तात्काळ द्यावे, मेहकर व लोणार तालुक्यातील शेत व पाणंद रस्ते तात्काळ तयार करून द्यावे, मेहकर व लोणार तालुक्यात स्मशान व दफन भूमीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी यासह इतर मागण्यांसाठी शिवसेना नेते सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात व शिवसेना नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली या भव्य परिवर्तन मोर्चाला दि. ३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे संपर्क कार्यालय जानेफळ रोड येथून प्रारंभ होणार आहे. तर मेहकर येथील तहसील कार्यालय येथील उपविभागीय अधिकारी




यांना निवेदन देण्यात येणार आहे. उपविभागीय अधिकारी मेहकर यांना मागण्यांचे निवेदन दिल्यानंतर ह्या मोर्चाचे स्वातंत्र्य मैदानावर सभेत रूपांतर होणार आहे.

### विकासासाठी परिवर्तन मोर्चात सहभागी व्हा : सिद्धार्थ खरात

विकासाच्या बाबतीत अत्यत मागास असलेल्या मेहकर मतदार संघाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी शिवसेना नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली मेहकर येथे ३ ऑक्टोबर रोजी भव्य परिवर्तन मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या भव्य परिवर्तन मोर्चात मतदार संघाच्या सर्वांगिण विकासासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व विकासासाठी आपले योगदान द्यावे, यासाठी मेहकर विधानसभा मतदार संघातील मतदारांनी तथा शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन शिवसेना नेते सिद्धार्थ खरात यांनी केले आहे..

### विविध मान्यवरांची राहणार उपस्थिती

मेहकर येथील परिवर्तन मोर्चाला संबोधीत करण्यासाठी विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, संपर्क प्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, उपजिल्हा प्रमुख प्रा. आशिष रहाटे, जिल्हा संघटक, तालुका प्रमुख, शहर प्रमुख सह इतर सर्व पदाधिकारी, शिवसेना, युवासेना, महिला आघाडी यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी राज्य व केंद्र शासनाच्या तुघलुकी कारभारावर ना.अंबादास दानवे व मान्यवर चांगलेच ताशेरे ओढले जाणार आहेत. त्यामुळे ३ ऑक्टोबर रोजी धडकणाऱ्या ह्या भव्य परिवर्तन मोर्चाकडे मतदार संघातील मतदारांसह जिल्हावाशीयांचे लक्ष लागले आहे.

# राज्यात ग्रामीण भागातील शैक्षणिक पद्धतीत अमुलाग्र बदल करा

## माजी मंत्री सुबोध सावजी यांचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना निवेदन

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात शासनाच्या धोरणामुळे शिक्षणाचे पुरते वाटोळे होत असून याचा परिणाम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर होत आहे. त्यामुळे आपण राज्यातील शैक्षणिक धोरणपद्धतीबाबत लक्ष घालून महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील शैक्षणिक पद्धतीत अमुलाग्र बदल करावा, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

माजी मंत्री सुबोध सावजी यांनी राज्यपाल या यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की ,महाराष्ट्र राज्यात वर्ग पहिला ते नवव्या वर्गापर्यंत सध्याच्या शैक्षणिक पद्धतीत विद्यार्थ्यांच्या बुद्धीमत्तेची चाचणी होत नाही. विद्यार्थाला पहिल्या वर्गात दाखल केल्यावर वर्ग नऊ पर्यंत शासकीय नियमाने त्याला परिक्षेत पास करावेच लागले. वर्ग १० मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यास शाळेकडून वर्ग दहाच्या परिक्षेत विस किंवा त्यापैकी गुण देण्याचा नियम आहे. सरासरी सर्वच शाळांमधून विद्यार्थ्यांचा बुद्धांक न पाहता जास्तीत जास्त गुण दिल्या जातात. महाराष्ट्र राज्यामध्ये तिस वर्षापूर्वी शिक्षण खात्याकडे असलेला कामाचा व्याप व सद्या परिस्थितीत असलेला कामाचा व्याप पाहता दोन जिल्ह्याला एक शिक्षण मंडळ कार्यालय असणे आवश्यक आहे. राज्यात शैक्षणिक नियमात विद्यार्थ्यांना अभ्यास न केल्यास धमकावने शिक्षा न करणे यावर बंदी आहे.यामुळे शैक्षणीक स्तर खालावत आहे.राज्यामध्ये सुंदर माझी शाळा असे अभियान मुख्यमंत्र्याद्वारे चालविले जात आहे. या अभियानात विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर तपासल्या जात नसून शाळेची इमारत, शाळेचा परिसर तपासल्या जात आहे. या तपासणीत काही अधिकार्यांनी आपली बुद्धीमत्ता गहाण ठेवून प्राथमिक शाळेत छापीव बोर्ड लावले. त्याचा मजकुर असा आहे की तंबाखूमुक्त शाळा ज्या शाळेतील मुलांना तंबाखू ही वस्तुच माहित नाही, त्यांना तंबाखू काय आहे या बोर्डमुळे माहित झाले आहे. राज्यामध्ये पदवी परिक्षेत गुणाणुक्रमाने प्रवेश मिळविण्याकरिता मोठ्या प्रमाणावर हजारो रुपयाच्या शुल्कात खाजगी वर्ग सुरु आहेत. या पद्धतीचा फायदा दोन पाच टक्के विद्यार्थना होतो. ही फार मोठी आर्थिक लयलूट आहे. हे सर्व शासनाच्या सहकार्याने सुरु आहे. महोदय मी गेल्या पन्नास वर्षापासून सामाजिक शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात काम करित आहे. आपणामार्फत शासनास निर्देशित करावयाचे आहे की वर्ग ९ पर्यंतच्या सर्व वार्षिक परिक्षेत पूर्वीप्रमाणे पास-नापास ही पद्धत अवलंबावी. वर्ग



दहावीच्या परिक्षेत शाळेकडून देण्यात येणारे विस गुण ही पद्धत पूर्णपणे बंद करावी. महाराष्ट्रामध्ये शिक्षण खात्याचे वाढलेले काम पाहता दोन जिल्ह्याला एक शिक्षण मंडळ कार्यान्वित करावे, विद्यार्थी शाळेत शिकत असताना शिक्षकांनी त्याला धमकावणे, शिक्षा करणे ही आवश्यक बाब करावी, राज्यामध्ये सुंदर माझी शाळा यासोबत उच्च दर्जाचे माझ्या शाळेचे शिक्षण याची तपासणी मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा अभियानात करावी, सुंदर माझी शाळाची तपासणीत अनेक बाबी अनावश्यक आहेत.यामध्ये तंबाखु मुक्त शाळा हा बोर्ड छापण्यासाठी मुभा उच्च भावात देयात आली आहे. त्यामुळे शासकीय पैश्याची उधळपट्टी करण्यात आली आहे. या सर्व प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करावी, तसेच महाराष्ट्र राज्याच्या शैक्षणिक धोरणामध्ये बदल करावा, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी राज्यपाल पी.सी. राधाकृष्णन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पान १ वरून...

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

देण्यात आली आहेत, ज्यामुळे त्यांचा सूर्याशी असलेला संबंध प्रतिबिंबित होतो. हे उच्च-रिझोल्यूशन मॉडेल उष्णकटिबंधीय चक्रीवादळे, मुसळधार पाऊस, मेघगर्जना, गारपीट, उष्णतेच्या लाटा, दुष्काळ आणि इतर गंभीर हवामान घटनांशी संबंधित अंदाजांची अचूकता आणि आघाडी वेळ लक्षणीयरित्या वाढवतील.

प्रधानमंत्री पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू क्षेत्रातील विविध उपक्रमांचा शुभारंभ करतील आणि देशाला समर्पित करतील, ज्यांची एकूण किंमत १० हजार ४०० कोटी रुपये आहे. हे उपक्रम ऊर्जा, पायाभूत सुविधा, ट्रक आणि कॅब चालकांच्या सुरक्षितता आणि सोयीसाठी, स्वच्छ गतिशीलता आणि शाश्वत भविष्य यावर केंद्रित आहेत.

ट्रक चालकांना सोयीचा प्रवास अनुभव मिळावा यासाठी प्रधानमंत्री छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र), फतेहगड साहिब (पंजाब), सोंगढ (गुजरात), बेळगावी आणि बेंगळुरु ग्रामीण (कर्नाटक) येथे 'वे साइड ॲमेनिटीज' सुरू करतील. ट्रक आणि कॅब चालकांच्या लांब प्रवासादरम्यान आरामदायी प्रवास विश्रांतीसाठी आधुनिक सुविधा विकसित करण्याच्या उद्देशाने, अंदाजे २ हजार १७० कोटी रुपये खर्चून १ हजार रिटेल आउटलेट्सवर वे साइड ॲमेनिटीज विकसित केल्या जातील, ज्यामध्ये स्वस्त निवास आणि भोजनाची व्यवस्था, स्वच्छ शौचालये, सुरक्षित पार्किंग जागा, स्वयंपाक क्षेत्र, वाय-फाय, जिम इत्यादी सुविधा असतील.

एकाच रिटेल आउटलेटवर पेट्रोल, डिझेल, सीएनजी, ईव्ही, सीबीजी, इथेनॉल मिश्रित पेट्रोल (ईबीपी) सारख्या अनेक ऊर्जा पर्यायांचा विकास करण्यासाठी, पंतप्रधान 'एनर्जी स्टेशन्स' सुरू करतील. सुमारे ४ हजार एनर्जी स्टेशन्स पुढील पाच वर्षांत गोल्डन क्वाड्रिलॅटरल, पूर्व-पश्चिम आणि उत्तर-दक्षिण कॉरिडॉर आणि इतर प्रमुख महामार्गांवर अंदाजे ६ हजार कोटी रुपये खर्चून विकसित करण्यात येतील. हे एनर्जी स्टेशन्स विविध इंधन पर्यायांची सोय करून ऊर्जा वापरणाऱ्यांसाठी सहज गतिशीलता प्रदान करतील.

ग्रीन एनर्जी, डी-कार्बनायझेशन आणि शून्य उत्सर्जनात रूपांतर सुलभ करण्यासाठी प्रधानमंत्री ५०० इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सुविधांचा शुभारंभ करतील. आर्थिक वर्ष २०२५ पर्यंत १० हजार इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यासाठी अंदाजे १ हजार ५०० कोटी रुपये खर्च होईल.

देशभरात २० द्रवीकृत नैसर्गिक वायू (ङछॠ) स्टेशन सुरू करण्यात येतील, ज्यामध्ये महाराष्ट्रातील ३ स्टेशनचा समावेश आहे. स्वच्छ इंधनाच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी, तेल आणि वायू कंपन्या विविध राज्यांमध्ये ५० एलएनजी (ङछॠ) फ्युएल स्टेशन विकसित करतील, ज्याची एकूण किंमत सुमारे ५०० कोटी रुपये आहे.

१ हजार ५०० ई२० (२०% इथेनॉल मिश्रित) पेट्रोल रिटेल आउटलेट्स, ज्यांची एकूण किंमत सुमारे २२५ कोटी रुपये आहे, पंतप्रधान देशाला समर्पित करतील.

सोलापूर विमानतळाचे उद्घाटन प्रधानमंत्री करतील, ज्यामुळे पर्यटन, व्यावसायिक प्रवासी आणि गुंतवणूकदारांसाठी सोलापूर अधिक प्रवेशयोग्य होईल. सोलापूरच्या विद्यमान टर्मिनल इमारतीचे नूतनीकरण करण्यात आले असून ते दरवर्षी सुमारे ४.१ लाख प्रवाशांची सेवा देईल.

प्रधानमंत्री छत्रपती संभाजीनगरपासून २० किमी दक्षिणेला असलेल्या बिडकिन औद्योगिक क्षेत्राचे उद्घाटन करतील, हा एक परिवर्तनकारी प्रकल्प आहे, जो राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमांतर्गत विकसित केला आहे. दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर अंतर्गत विकसित केलेल्या या प्रकल्पाची एकूण किंमत ६ हजार ४०० कोटी रुपये आहे, आणि ते ३ टप्प्यांमध्ये विकसित केले जाईल.

## ठरलं! महायुतीच्या

आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना फोडा आणि आपल्याकडे जोडा, असे निर्देश अमित शाहांनी दिलेत. नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिकमध्ये नेते आणि पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. विदर्भासाठी त्यांनी मिशन ४५ चा, तर मराठवाड्यासाठी मिशन ३०चा नारा दिलाय. संभाजीनगरमधल्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांनी आपापल्या पक्षांचे सर्व्हे अमित शाह यांच्याकडे सोपवल्याची माहिती आहे. जागावाटपासंदर्भात महायुतीची लवकरच दिल्लीत बैठक होणार आहे.

१० ते २० नोव्हेंबर दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुका पार पडणार आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. २८ नोव्हेंबरच्या आधी राज्यात नवी विधानसभा अस्तित्वात येणं, अत्यंत आवश्यक आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, मतदानाचे सर्व टप्पे संपल्यानंतर किमान एक दिवस गॅप ठेवून मतमोजणी करणं अत्यंत आवश्यक असतं. त्यामुळे हे लक्षात घेता, महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकांचे टप्पे १० ते २० नोव्हेंबर दरम्यान येतील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

## मनोज जरांगे यांचे उपोषण

पण या काळात त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी सरकारने कोणतंही पाऊल उचललं नसल्याचं दिसून आलं. तर दुसरीकडे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनीही जरांगेंच्या विरोधात आंदोलन सुरू केलं.

दरम्यानच्या काळात मनोज जरांगे यांची तब्येत खालावली. त्यामुळे त्यांनी उपचार घ्यावेत असा आग्रह अंतरवालीत जमलेल्या बांधवांनी केला होता. या काळात जरांगेंना दोन वेळा सलाईनही लावण्यात आली. आता त्यांची तब्येत अधिकच खालावल्याने त्यांनी आपलं आंदोलन स्थगित केलं आहे.

गेल्या नऊ दिवसांपासून सुरू असलेलं आंदोलन जरांगेंनी स्थगित केल्यानंतर त्यांनी सरकारला इशारा दिला आहे. मराठा समाजाला जर आरक्षण दिलं नाही तर येत्या निवडणुकीमध्ये पाडापाडी झाली तर मला जबाबदार धरू नका असा इशारा त्यांनी दिला. तसेच मराठा समाजातील तरुणांनाही त्यांनी सल्ला दिला. मराठा तरूणांनी कोणत्याही राजकीय नेत्याच्या आणि त्यांच्या मुलांच्या पाठीशी न फिरता समाजासाठी काम करावं, आपली प्रगती करावी असंही ते म्हणाले. कोणत्याही राजकीय नेत्याच्या मागे फिरू नका असं सांगत मनोज जरांगे म्हणाले की, माझ्या लोकांना मारहाण केली, पण माझं ऐकून त्यांनी मार खाल्ला. सरकारने आरक्षण दिलं नाही तर आपण सत्तेत बसून आरक्षण घेणार. श्रीमंत मराठे आपली पोरं कधीच मोठ होऊ देणार नाहीत. शेतकरी मराठा रात्रंदिवस चिखलात, उन्हात काम करून आपलं लेकरु कधी नोकरीला लागेल याची वाट बघतो. मजूर मराठादेखील त्याची वाट बघतो. त्यामुळे मराठा आरक्षण मिळावं अशी इच्छा प्रत्येक मराठा बांधवाची आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# पंजाबरावांचा हवामान अंदाज पुन्हा खरा ठरला, महाराष्ट्रातील ‘या’ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस !

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : विदर्भ विभागातील अकरा जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या विखुरलेला स्वरूपाचा पाऊस पडणार तर दुसरीकडे नांदेड, लातूर,बीड, उस्मानाबाद, परभणी, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पुणे, कोकण, मुंबई आणि उत्तर महाराष्ट्रात म्हणजेच नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार, जळगाव या भागात हे दोन दिवस भाग बदलत जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

जेष्ठ हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांचा हवामान अंदाज पुन्हा एकदा खरा ठरला आहे. राज्यात गेल्या दोन-तीन दिवसांपासून पाऊस सुरू झाला आहे. नाशिक, अहमदनगर, पुणे, कोकण, मुंबई सह राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम आणि काही ठिकाणी जोरदार स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. अहमदनगर जिल्ह्यात पावसाची तीव्रता सर्वाधिक पाहायला मिळाली.

आम्ही आपणास सांगू इच्छितो की पंजाबराव डख यांनी नुकत्याच काही दिवसांपूर्वी एक हवामान अंदाज जारी केला होता. या हवामान अंदाजात पंजाबरावांनी २१ सप्टेंबर पासून महाराष्ट्रात पावसाला सुरुवात होणार असे म्हटले होते. यानुसार राज्यात २१ सप्टेंबर पासून पाऊस सक्रिय झाला असून सर्व दूर हलका ते मध्यम पाऊस बरसत आहे.

तसेच काही भागात जोरदार स्वरूपाचा पाऊस झाला आहे. यामुळे पुन्हा एकदा पंजाब रावांचा हवामान अंदाज खरा ठरला अशा चर्चा सुरू झाल्या आहेत. दरम्यान आज आपण पंजाब रावांनी महाराष्ट्रात आणखी किती दिवस जोरदार पावसाची शक्यता वर्तवली आहे या संदर्भात थोडक्यात माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.



## संक्षिप्त...

### आजपासून मनसेच्या परिवर्तन यात्रेला सुरुवात



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : आज पुरातन जागृतेश्वर मंदिरात दर्शन घेऊन मनसेच्या परिवर्तन यात्रेची सुरुवात करण्यात आली. आजपर्यंत नवी मुंबईतील काही ठराविकच लोकांनी मंत्री, आमदार, खासदार अशी अनेक महत्वाची पद भूषवली मात्र आजही नवी मुंबईकर नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. यावेळी मनसे शहराध्यक्ष गजानन काळे म्हणाले की आरोग्य, शिक्षण, सुरक्षा युवकांना रोजगार आणि सर्वात महत्वाचे मुद्दे आहेत. मूळ नवी मुंबईकर असलेल्या भूमिपुत्रांच्या गरजेपोटी बांधलेल्या घराला अधिकृत करण्याचा प्रश्न अजूनही भिजत ठेवला आहे. प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित झाली पाहिजेत. हा याच्यावर आरोप करतो, तो त्याच्यावर आरोप करतो कोणीतरी १ लाख रुपये बक्षीस जाहीर करतो, श्रेय घेण्यासाठी लढत आहेत पण आम्ही यामध्ये पडत नाही. राज्यकर्त्यांना माझा प्रश्न आहे अक्षता म्हात्रेच्या गुन्हेगारांना फाशी कधी होणार ? असा प्रश्न गजानन काळे यांनी सरकारला विचारला आहे. आमच्या रोजगार मेळाव्यात मराठी तरुणांना कामं मिळाली आहेत तसेच येत्या २ ऑक्टोबरला पत्रकार परिषद घेऊन आमच्या पक्षाचा कर्तव्यनामा जाहीर करणार असल्याचे गजानन काळे यांनी सांगितले आहे.

### दक्षता व भ्रष्टाचार निर्मूलन समितीची सभा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : जिल्हा दक्षता समितीची सभा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहामध्ये गुरुवार, दि. २६ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आली आहे. तसेच भ्रष्टाचार निर्मूलन समितीची सभा शुक्रवार, दि. २७ सप्टेंबर रोजी दुपारी ५ वाजता घेण्यात येणार आहे.

जिल्हा दक्षता समिती सभा तसेच जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीची सभा यात ज्या व्यक्तींना तक्रारी दाखल करावयाच्या असतील त्यांनी प्रतिज्ञालेखासह तक्रारी स्पष्ट शब्दात सबळ पुराव्यानिशी समिती समोर दाखल करावे, असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या तहसिलदार यांनी केले आहे.

### झेनिथ धबधब्याजवळ वाहून गेली २२ वर्षीय तरुणी

दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी** : पावसाळ्यात बाहेर फिरायला जाताना सर्वांनीच काळजी घेतली पाहिजे, पण गेल्या काही वर्षात सोशल मीडियावर फोटो अपलोड करण्यासाठी किंवा पावसाळी पिकनिकच्या आठवणी कॅमेऱ्यात कैद करण्यासाठी तरुणाई बेधुंद होते. पुणे, रायगड, सातारा जिल्ह्यात गेल्या काही महिन्यात पर्यटनस्थळी अनेक दुर्घटना घडल्या आहेत. त्यातच, दोन दिवसांपासून मुंबईसह राज्यात मुसळधार पाऊस सुरू असून नदी, ओढ्यांना पाणी आलं आहे. रायगड जिल्ह्यातील खोपोली येथे याच पाण्यातून मार्ग काढताना एका युवतीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. खोपोलीतील झेनिथ धबधब्याच्या प्रवाहातून वाहून गेलेली युवती मृतावस्थेत आढळून आली. खोपोलीच्या दत्त मंदिर मठाजवळ धबधब्याचा प्रचंड मोठा प्रवाह वाहत होता. या प्रवाहातून खोपोलीतील कृष्णा व्हॅली येथील एका कुटुंबातील चौघे जण मार्ग क्रॉस करताना प्रवाहात अडकले होते. याबाबतची माहिती मिळताच रेस्क्यू ऑपरेशन सुरू करण्यात आले. मात्र, रेस्कू ऑपरेशन सुरू करण्यापूर्वीच पाण्यात अडकलेल्या कुटुंबातील २२ वर्षीय तरुणी वाहून गेली. यावेळी, सोबतच्या नातेवाईकांनी मुलीला वाचविण्याचा प्रयत्न केला, पण तो अयशस्वी ठरला.

रायगडमधील या दुर्घटनेत सुदैवाने दोन महिला व एक युवक बचावले आहेत. पण, २२ वर्षीय तरुणी स्वप्नाली ही पाण्यात वाहून गेल्यामुळे तिचा मृत्यू झाला. धबधब्याजवळील पाण्यात अडकलेल्या ठिकाणाहून स्वप्नाली ५-६ किलोमीटर पाण्यात वाहत गेली होती. त्यामुळे, रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी मदत व बचाव कार्य सुरू केल्यानंतर पेपको कंपनीच्या पुलाजवळ सदर तरुणीचा मृतदेह पथकाला आढळून आला. रेस्कू पथकाने हेल्प फौंडेशन आणि पोलिसांच्या मदतीने ३ तासांच्या आत युवतीला मृतदेह शोधून काढला. दरम्यान, घटनास्थळी खोपोली पोलीस निरीक्षक शीतल राउत व इतर पोलीसही उपस्थित होते.

### सोन्याच्या दरात उच्चांकी दरवाढ, पहिल्यांदाच सोन्याने गाठला ७५ हजारांचा आकडा

**मुंबई/प्रतिनिधी** : सणासुदींच्या दिवसांत सोनं-चांदीच्या दरात मोठी उसळी घेतली आहे. सोन्यानं नवा उच्चांक गाठला आहेय वायदे बाजारात पहिल्यांदा सोनं पहिल्यांदा ७५ हजारांच्या वर गेलं आहे. ण्ध्श्ऍ वरील किंमत देखील त्र२,६६५ चा विक्रमी उच्चांक ओलांडली आहे. याचा परिणाम म्हणून वायदे बाजारात सोन्याच्या किमतीत वाढ दिसून येत आहे.

दुसरीकडे, काल चांदीच्या भावानेही ३३०० रुपयांची उसळी घेत ९२५०० रुपयांच्या वर पोहोचला होता, तर आंतरराष्ट्रीय बाजारातही भावाने ४ टक्क्यांनी मोठी उसळी घेत ३२ डॉलरच्या वर पोहोचला होता.गुडरिटर्न्सनुसार, आज सोन्याच्या दरात ६६० रुपयांची वाढ झाली असून २४ कॅरेट सोनं प्रतितोळा ७७,०२० रुपयांवर पोहोचलं आहे. तर. २२ कॅरेट सोन्याच्या दरात ६०० रुपयांची वाढ झाली असून प्रतितोळा ७०,६०० रुपयांवर दर स्थिरावले आहेत. १८ कॅरेट सोन्याच्या दरात ५०० रुपयांची वाढ झाली असून ५७,७७० रुपयांवर स्थिरावलं आहे.

## रस्त्यांसाठी सोमवारी रास्ता रोको आंदोलन

### शिवसंग्रामचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

गेल्या अनेक वर्षापासून आठही शेत रस्त्यांची दयनीय अवस्था आहे. रस्त्यांची दुरुस्तीसाठी शेतकऱ्यासह संबंधिताकडे वारंवार तक्रारी केल्या, रास्ता रोको आंदोलन केले, तरीही संबंधितांकडून दखल घेतली गेली नाही, त्यामुळे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ३० सप्टेंबर रोजी सस्ती येथे शेतकऱ्यांसह रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.
**-दिलीप परनाटे जिल्हाध्यक्ष शिवसंग्राम**

**पातूर :** पातुर तालुक्यातील सस्ती येथे आठ शेत रस्ते असून, एकही शेत रस्त्यांची पूर्णपणे दुरुस्ती करण्यात आली नाही, त्यामुळे रस्त्यांची दुरुस्तीसाठी संबंधिताकडे वारंवार तक्रारी करूनही दखल घेत नसल्याने सोमवार रोजी सकाळी दहा वाजता शिवसंग्रामचे जिल्हा अध्यक्ष दिलीप परनाटे यांच्या नेतृत्वात सस्ती येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. सस्ती येथे आठही शेत रस्त्याची दयनीय अवस्था असल्यामुळे पावसाळ्यात रस्त्यावर चिखल व पाणी साचत असल्याने दरवर्षी शेतीची कामे रखडली जातात, रस्त्याची दुरुस्तीसाठी संबंधिताकडे वारंवार तक्रारी केल्या यापूर्वी रास्ता रोको आंदोलन सुद्धा करण्यात आले होते. परंतु संबंधितांकडून वारंवार कोरडे आश्र्वासन दिले जातात, त्यामुळे या आठही शेत रस्त्यांची दुरुस्ती २९ सप्टेंबर पर्यंत सुरू करावी अन्यथा रस्त्याच्या दुरुस्तीकरिता शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवार दि.३० सप्टेंबर रोजी सस्ती येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष दिलीप परनाटे यांनी २३ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

## याला एन्काऊन्टर कसे म्हणणार? पोलिसांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे : हायकोर्ट

**मुंबई/प्रतिनिधी** : बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणामध्ये एन्काऊन्टर करण्यात आलेला आरोपी अक्षय शिंदेंच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने सरकारी वकिलांवर प्रश्नाचा भडीमार केल्याचं सुनावणीदरम्यान पाहायला मिळालं. न्यायालयाने पोलिसांची बाजू मांडणाऱ्या सरकारी वकिलांना अनेक प्रश्न विचारले. यामध्ये अगदी आरोपीला कधी रुग्णालयात दाखल करण्यात आलं इथपासून ते पिस्तूल अनलॉक का होती इथपर्यंत प्रश्नांची सरबत्ती कोर्टाने लावली.

याचिकेवर सुनावणी सुरु झाल्यानंतर पोलिसांची बाजू मांडणाऱ्या सरकारी वकिलांनी, ''घटनेनंतर २५ मिनिटांमध्ये जखमींना कळव्याच्या शिवाजी रुग्णालयात दाखल करण्यात आले,'' असं सांगितलं. त्यानंतर न्यायालयाने आरोपीवर गुन्हा कधी दाखल झाला? त्याला रुग्णालयात कधी नेण्यात आलं? शवविच्छेदन केव्हा करण्यात आलं? यासंदर्भातील माहिती सरकारी वकिलांना विचारण्यात आली.

फायर करण्यात आले ते पिस्तूल होते की रिव्हलवर? असा प्रश्न न्यायालयाने विचारला असता सरकारी वकिलांनी पिस्तूल होतं अशी माहिती दिली. त्यावर न्यायालयाने, ''पिस्तूल लोड केलेलं होतं का? ते कसे लोड करण्यात आले? पिस्तूल लॉक का केलेले नव्हते? ऐवढा निष्काळजीपणा का केला?'' असा सवाल न्यायालयाने सरकारी वकिलांना विचारला.

''पिस्तूलवर आरोपीच्या हाताचे ठसे आहेत का?'' यासंदर्भातील अहवाल पुढील सुनावणीत सादर करण्याचे आदेश न्यायालयाने सरकारी वकिलांना दिले आहेत. तसेच ''आरोपीने जर तीन गोळ्या झाडल्या आणि त्यातील एक गोळी पोलिसाला लागली तर बाकीच्या दोन गोळ्यांचं काय झालं?'' असा प्रश्नही न्यायालयाने सरकारी वकिलांना विचारला. पोलिसांनी गोळ्या झाडताना हातावर पायावर गोळ्या झाडायला पाहिजे होत्या, असं न्यायालयाने सुनावणीदरम्यान म्हटलं.

### तुम्ही भारतातील कोणत्याही भागाला पाकिस्तान म्हणू शकत नाही, सीजेआय डीवाय चंद्रचूड संतापले

दिल्ली : सुप्रीम कोर्टाने कर्नाटक हायकोर्टाचे न्यायाधीश वी श्रीशानंद यांच्याविरोधातील सुनावणी बंद केली आहे. न्यायाधीश वी श्रीशानंद यांनी कोर्टात सुनावणीदरम्यान केलेल्या वादग्रस्त विधानांबद्दल माफी मागितल्यानंतर ही सुनावणी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाचे नेतृत्व करणारे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी हा निर्णय न्याय आणि न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेसाठी दिला असल्याचे सांगितले.

नुकत्याच झालेल्या न्यायालयीन सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती श्रीशानंद यांनी बंगळुरूमधील मुस्लिम बहुल भागाचा उल्लेख ''पाकिस्तान'' असा केला होता. तसंच एका महिला वकिलाला फटकारताना अंडरगारमेंटचा उल्लेख केला होता. या सुनावणीचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यानंतर सुप्रीम कोर्टाने कर्नाटक हायकोर्टाकडून अहवाल मागवला होता, जो तात्काळ सादर करण्यात आला.

भारताच्या कोणत्याही भूभागाला कोणीही पाकिस्तान म्हणू शकत नाही, असे सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी सांगितलं.

## विकासकाच्या मुलाचे अपहरण करून ४० कोटींची मागणी

### अंबरनाथ पोलिसांनी १२ तासांत १०० पोलिसांच्या मदतीने दहा आरोपींना ठोकल्या बेड्या

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी** : मुंबई महानगरपालिकेच्या फायर विभागाचे निलंबित कर्मचाऱ्यांनी फसवणूक केलेल्या तरुणांसोबत मिळून अंबरनाथ मधील मोठ्या विकासकाच्या मुलाचे अपहरण केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे याप्रकरणी अंबरनाथ पोलिसांनी शंभर पोलिसांच्या मदतीने बारा तासाच्या आत दहा आरोपींना बेड्या ठोकत मुलाची सुरक्षित सुटका केली आहे.



देविदास वाघमारे आणि दत्तात्रय पवार अशी या मुख्य आरोपींची नावे असून हे दोघे मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशामक दलामध्ये कार्यरत होते मात्र ४० तरुणांना अग्निशामक दलात काम देतो असे सांगून प्रत्येकी दहा लाख रुपये असे करोडोची फसवणूक या दोघांनी केली होती याप्रकरणी हे जामीनावरती बाहेर फिरत असून त्यांची रक्कम परत करण्यासाठी या दोघांनी फसवणूक केलेल्या तीन ते चार जणांसोबत मिळून अंबरनाथ मधील एका विकासाच्या मुलाचे अपहरण करून त्याच्या वडिलांकडून व्हिडिओ कॉल करत चाळीस करोड रुपयाची मागणी केली होती मात्र पोलिसांनी सापळा रचत या सर्व आरोपींना बेड्या ठोकत या आरोपी कडून दोन अग्निशस्त्र चार जिवंत काडतूस हत्यारे आणि महागड्यातील अपहरण करण्यासाठी वापरलेल्या गाड्या जप्त करण्यात आले आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणाऱ्या भुयारी मेट्रोचे उद्घाटनाची तयारी अंतिम टप्प्यात

दैनिक आपला विदर्भ






**पुणे/प्रतिनिधी** : पंतप्रधान नरेंद्र मोदी हे उद्या पुणे दौऱ्यावर येणार आहे. पंतप्रधान मोदींच्या हस्ते भुयारी मेट्रोचे उद्घाटन केले जाणार आहे. तर स्वारगेट ते कात्रज या नव्या मेट्रो मार्गाचे भूमीपूजन मोदींच्या हस्ते होणार आहे. या निमित्ताने पुण्यात जय्यत तयारी सुरु करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेवर पावसाचे सावट पाहायला मिळत आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचं क्षेत्र निर्माण झाल्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा पाऊस सक्रीय झाला आहे. त्यामुळे हवामान विभागाने २७ सप्टेंबरपर्यंत महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळेल असा अंदाज वर्तवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा पुण्यातील एस.पी. कॉलेजच्या मैदानावर होणार आहे. या मैदानावर जय्यत तयारीही सुरु आहे. पुण्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. या मुसळधार पावसामुळे मैदानावर चिखल झाला आहे. चिखल झालेल्या ठिकाणी माती टाकली जात आहे. मात्र पुढील दोन दिवस म्हणजे आज आणि उद्या मुसळधार पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे या सभेच्या ठिकाणी या दृष्टीने तयारी सुरू आहे. पण पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सभेवर पावसाचे सावट पाहायला मिळत आहे.

सिव्हिल कोर्ट ते स्वारगेट ही महत्वाची शेवटचा लाईन १ फेज आहे. ३.६२ किलोमीटर उद्घाटन होणार आहे. नव्याने मंजूर झालेले स्वारगेट ते कात्रज भूमिपूजन होणार आहे. २९५४० कोटी खर्च आहे. ५.४६० किलोमीटर अंतर आहे. यामध्ये ३ स्टेशन आहेत. नोर्थ साऊथ कॉरिडॉर पुर्ण होइल जेव्हा कात्रज स्वारगेट मेट्रो पुर्ण होइल. पंतप्रधान मेट्रोतून प्रवास करणार आहेत. उदया दुपारी काही वेळ डिस्ट्रिक्ट कोर्ट वाहतूक बंद असणारं आहे.१.३० नंतर मेट्रो बंद असणारं आहे. मेट्रो पर्यायी मार्गे शिवजी नगर मेट्रो पासुन मोफत बस सेवा दिली जाईल. पाच तासांचा ब्लॉक राहणार आहे. वनाज रामवाडी चालु राहील डिस्ट्रिक्ट कोर्ट बंद राहील. पिंपरी चिंचवड येणाऱ्या नागरीकांना शिवाजी नगर पर्यंत सुरु राहणार आहे.

भिडे वाड्याच्या स्मारक भूमीपूजन होणार आहे. पेट्रोलिय मंत्रालयाचे काही कामचा उद्घाटन करण्यात येणारा आहे.१२ विवीध प्रकल्पाचे उद्घाटन करण्यातयेणाराआहे.

## विविध वृत्त...

### वाघाडी सरपंचांवरील हल्ल्या प्रकरणी १४ जणांना अटक एस पी श्रीकांत धीवरे यांची माहिती




दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** शिरपूर तालुक्यातील वाघाडी येथील सरपंच व भाजप चे तालुका अध्यक्ष किशोर माळी यांच्या वर २० सप्टेंबर रोजी हल्ला झाला होता. यातील १४ आरोपींना पोलीसांनी अटक केली आहे. यातील मुख्य आरोपी उपसरपंच जगदीश रघुनाथ कोळी यांच्या सह १४ जणांना पोलीसांनी अटक केली आहे. यातील काही आरोपींना वाघाडी येथून, काहींना शहादा रस्त्यावरील एका शेतातून तर दोन आरोपींना मध्यप्रदेशातील पानसेमल येथून अटक केली आहे.

### धुळ्यातील मराठा आंदोलक उतरले रस्त्यावर; आंदोलकांनी केला चक्काजाम



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणाच्या मुद्यावर सकल मराठा समाजाच्यावतीने आज मुंबई–आग्रा महामार्गावर 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात आले. महामार्गावर वाहतूक ठप्प झाल्याने पोलिसांनी वेळीच दखल घेत आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी प्रचंड घोषणाबाजी केली. दरम्यान, आंदोलकांनी यावेळी आरक्षणयोध्दा मनोज जरांगे–पाटील यांच्या मागण्या त्वरीत मान्य करण्यात याव्यात अन्यथा राज्यभरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण होवू शकतो, असा इशाराही दिला.

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आरक्षण योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सुरू केले आहे. उपोषणाला आज नववा दिवस असून उपोषणामुळे दिवसागणिक जरांगे यांची प्रकृती खालावत आहे. मात्र याकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे. याचा निषेध म्हणून आज मुंबई–आग्रा महामार्गावर सकल मराठा समाजाच्यावतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक ठप्प झाल्याने वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. परिणामी, पोलिसांनी दखल घेत आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर महामार्गावरील वाहतूक सुरळीत झाली. दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी प्रचंड घोषणाबाजी केल्याने परिसर दणाणला होता. या आंदोलनात भानुदास बगदे, विनोद जगताप, राजेंद्र काळे, निंबा मराठे यांच्यासह मराठा आंदोलक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### समाजकल्याण कार्यालयातील साहित्य खरेदीची ई-निवीदा प्रसिद्ध

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाच्या मुल्यमापन, संनियंत्रण व डाटा एंट्री (०.५%) योजनेअंतर्गत समाजकल्याण कार्यालय, बुलडाणा येथे साहित्य खरेदीची ई–निवीदा जेम पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. साहीत्य घेण्यास इच्छुक संस्थानी जेम पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे.

ऑल इन वन कॉम्प्युटर, स्कॅनर, प्रिंटर व झेरॉक्स मशिन इत्यादी साहित्य तसेच जिल्ह्यातील शासकीय तथा निमशासकीय कार्यालयांना अनुसूचित जाती उपयोजनाअंतर्गत विविध योजनांची प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी डिजीटल स्टँडी पुरविण्यासाठी जेम पोर्टलवर ई–निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर साहित्याविषयी विस्तृत माहिती व अटी शर्ती जेम पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

### रविवारी शौर्य दिनाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हा सैनिक कार्यालयातर्फे रविवार, दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात आयोजित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील माजी सैनिक, माजी सैनिक विधवा पत्नी, युध्द विधवा, विरमाता, विरपिता यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

भारतीय सैन्य दलाने दि. २९ सप्टेंबर २०१६ रोजी पाकिस्तान हद्यीत शिरून सर्जिकल स्ट्राईकद्वारे अतिरेक्यांचा खात्मा केला. भारतीय सैन्याची अभिमानास्पद कामगिरी राज्यातील जनतेपर्यंत व्यापक प्रमाणात पोहचविण्यासाठी शौर्य दिन साजरा करण्यात येत आहे. यानिमित्ताने माजी सैनिक, शहिद जवानांच्या विरपत्नी, विरमाता, विरपिता आणि शौर्य पदकधारकांचा सन्मान करण्यासाठी दरवर्षी दि. २९ सप्टेंबर रोजी शौर्य दिन साजरा करण्यात येतो. यावर्षी दि २९ सप्टेंबर रोजी शौर्य दिनाचा कार्यक्रम जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. यावेळी नागरिकांनी उपस्थित राहावे.

# अब तुम्हारे हवाले वतन साथीयो... देशसेवा करताना दिपज्योत मालवली

## वीर जवान दिपकची भव्य मिरवणूक

दैनिक आपला विदर्भ







**बुलडाणा/प्रतिनिधी :** देशरक्षसाठी जिवाची बाजी लावणार्या सैनिक दलातील व बुलढाण्यातील पळसखेड नाईक येथील २८ वर्षीय जवान दीपक दिवाकर बनसोड यांना दि. २२ सप्टेंबर रोजी जम्मू–काश्मीरमधील कुपवाडामध्ये वाहन अपघातात वीरमरण आले. त्यांच्या पार्थिव बुलढाणा येथे आणल्यानंतर शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी वीर जवान अमर रहे, जबतक चाँद रहेगा दिपक तुम्हारा नाव रहेंगा अशा गगणभेदी घोषणांनी आसमंत दणाणून गेला होता. तर बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांनी वीर जवान दिपक बनसोडे यांना अश्रूनयनांनी अखेरचा निरोप दिला. बुलढाणा जिल्ह्यातील पळसखेड नाईक येथील २८ वर्षीय जवान दीपक दिवाकर बनसोड हा ३० राष्ट्रीय रायफल मध्ये ते कार्यरत होते. दि.२२ सप्टेंबर रोजी जम्मू– काश्मीरमधील कुपवाडामध्ये वाहन अपघातात त्यांना वीरमरण आले.

या घटनेची माहिती गावात व नातेवाईकांना कळताच सर्वत्र दु:खाचा डोंगर कोसळला. दि.२५ सप्टेंबर रोजी वीर जवान दिपक बनसोड यांचे पार्थिव सकाळी ७ वाजता बुलढाणा येथे भारतीय सैन्य दलाच्या वाहनाने आणण्यात आले. त्यानंतर सजविलेल्या वाहनात वीर जवान दिपकच्या पार्थिवाची शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी वीर जवान अमर रहेच्या घोषणांनी आसमंत दणाणून गेला होता. तर बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांनी वीर जवान दिपक बनसोडे यांना अश्रूनयनांनी अखेरचा निरोप दिला. पळसखेड नागो या मूळ गावी सकाळी ११ वाजता शासकीय इतमामात पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. भारतीय सैन्य दल आणि पोलीस दलाच्या वतीने हवेत फेरींग झाडून सलामी देण्यात आली. यावेळी वीर जवान दिपक बनसोड यांच्या कुटुंबियांनी हंबरडा फोडून आपल्या अश्रुनयनांना वाट मोकळी करून दिली. यावेळी उपस्थितांचे मन हेलावून गेले. तर वीर जवान यांच्या कुटुंबियांसह मित्र, नातेवाईक व चाहत्यांनी हळहळ व्यक्त करीत मोठ्या जडअंतकरनाने व अश्रुनयनाने अखेराचा निरोप दिला.

वीर जवान दिपक बनसोड यांच्या पश्चात मुंबई येथे पोलिस दलात कार्यरत असलेली पत्नी, दोन भाऊ, एक बहीण, आई–वडील असा बराच मोठा परिवार आहे.

वीर जवान यांना त्यांचे मूळगाव पळसखेड नागो या मूळ गावी सकाळी ११ वाजता शासकीय इतमामात पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी बुलढाणा जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, तहसीलदार व माजी सैनिक आणि हजारोच्या संख्येने नागरिकांची उपस्थित होती.

### मान्यवरांनी व्यक्त केल्या भावना

यावेळी हर्षवर्धन सपकाळ, माजी आमदार तथा पंचायत राज समिती राष्ट्रीय अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष संजय राठोड यांच्यासह उपस्थित विविध मान्यवरांनी वीर जवान दिपक बनसोड यांच्या बद्दल शोकसंवेदना व्यक्त केल्या.

# आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी २७ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** शिक्षणाचा हक्क अंतर्गत २५ टक्के प्रवेश प्रक्रिया सन २०२४–२५ मध्ये निवड यादीतील बालकांना प्रवेश घेण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता पालकांना प्रवेशासाठी दि. २७ सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

बालकांचा मोफत आणि सक्तीचे शिक्षणाचा अधिकार अधिनियम सन २००९ नुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. त्यानुसार सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया सुरु आहे.

प्रक्रियेअंतर्गत लॉटरी पद्धतीने निवडपात्र ठरलेल्या तिसऱ्या फेरी (प्रतिक्षा यादीतील) बालकांना शाळेमध्ये प्रवेशासाठी दि. १४ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आलेली होती. शिक्षण संचालक प्राथमिक पुणे यांच्या निर्देशानुसार प्रतिक्षा यादीतील चौथ्या फेरीमध्ये बालकांना प्रवेश देण्यासाठी दि. २७ सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदत देण्यात आली असून, यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही. तरी जिल्ह्यातील यादीमध्ये नाव असलेल्या बालकांच्या पालकांनी विहीत मुदतीत तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे संबधित शाळेमध्ये आपल्या पाल्याचा प्रबेश अंतीम करावा. मुदतीनंतर प्रवेशाबाबत विचार केल्या जाणार नाही याची कटाक्षाने नोंद घ्यावी. प्रवेशासाठी आवश्यक कादपत्रांची यादी https://student.maharashtra.gov.in/admšportal या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तरी जास्तीत जास्त पालकांनी आरटीई २०२४–२५ वर्षातील प्रकियेत सहभागी होऊन आपल्या पाल्याचा प्रवेश शाळेमध्ये जावुन करुन घ्यावा, असे आवाहन शिक्षण विभाग (प्राथमिक) कार्यालयाचेवतीने करण्यात आले आहे. याबाबत काही अडचण असल्यास पोर्टलवर दिलेल्या हेल्पनलाईन क्रमांकावर तसेच जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडे संपर्क साधावा.

# शिरपूरमध्ये गांजाच्या शेतीवर पोलिसांचा छापा; तीन एकर शेतीत पेरणी केली होता गांजा





दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** शिरपूर तालुक्यातील सांगवी परिसरात गांजाची शेती होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात तालुका पोलिसांनी चौघांना ताब्यात घेतले असून गांजा तस्करी करणाऱ्या मुख्य म्होरक्याचा शोध घेतला जाणार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली.

शिरपूर तालुक्यात मध्य प्रदेशाच्या सीमावर्ती भागामध्ये लाकड्या हनुमान तसेच अन्य परिसरातून गांजाची शेती यापूर्वी देखील पोलीस दलाने उध्वस्त केली आहे. आज देखील शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे निरीक्षक जयपाल हिरे यांना या भागात मोठ्या प्रमाणावर गांजाचे पीक घेतले जात असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्यांनी ही माहिती तातडीने पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांना दिली .त्यानुसार पोलीस अधीक्षकांसह पोलीस पथकाने या ठिकाणी शेतात छापा मारला. यावेळी त्यांना गांजाची मोठ्या प्रमाणावर शेती होत असल्याचा प्रकार दिसून आला. पोलीस दलाने शिरपूर तालुक्यातील रोहिणी येथे राहणारे सुरज कालूसिंग पावरा, रोहित सुभाराव पावरा, समीर बळीराम पावरा, रसलाल हजारा पावरा या चौघांना ताब्यात घेतले आहे. पोलिसांची कारवाई उशिरापर्यंत सुरूच होती साधारण गांजाची किंमत ७०–८० लाख पर्यंत असल्याची माहिती पोलिसांनी दिली

# अमरावती जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटना समन्वय समितीच्यावतीने विराट महामोर्चा






दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने पालक, शिक्षक आणि शिक्षण प्रेमी जनतेचा जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट आक्रोश महामोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये जिल्ह्यातील शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

एकीकडे राज्यातील एकही शाळा बंद केली जाणार नाही अशी घोषणा करायची आणि दुसरीकडे शाळा दत्तक योजना, समूह शाळा योजनेची धोरणे आखायची हा उद्योग सुरु असून महाराष्ट्रातील गोरगरीब आणि सामान्य जनतेच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी नियोजन करण्याऐवजी त्यांच्या शैक्षणिक मार्गात अडथळ्यांची शर्यत उभी केली जात आहे. सरकारी कर्मचाऱ्यांमधील मोठी संख्या असलेल्या शिक्षकांची पदे कमी कशी करता येतील याची काळजी घेऊन धोरण आखले जात आहे.

यातूनच १५ मार्च २०२४ चा संच मान्यता निश्र्चित करणारा शासन निर्णय पारीत झाला. शाळा बंद करणार नाही, मुख्याध्यापक पदे अतिरिक्त होवू देणार नाही अशी फक्त घोषणा केली जाते.

प्रत्यक्षात मात्र महाराष्ट्रातील हजारो शाळांचे भवितव्य अंधारात ढकलणारा कंत्राटी भरतीचा शासन निर्णय ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनी जाहीर करुन राज्यातील शिक्षकांची क्रूर थट्टा करण्यात आली आहे असा आरोप शिक्षक संघटनांनी केला आहे.

कंत्राटी शिक्षक भरती रद्द करण्यात यावी, जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, १०–२०–३० चा आकृतिबंध लागू करण्यात यावा, तसेच ऑनलाईन कामापासून सूट मिळावी अशा मागण्या यावेळी शिक्षकांनी केल्या आहेत.

### माहिती अधिकार दिनी विविध उपक्रमाचे आयोजन करण्याचे आवाहन

**बुलडाणा/प्रतिनिधी :** दरवर्षी २८ सप्टेंबर हा दिवस 'माहिती अधिकार दिन' म्हणून साजरा करण्यात येत असून यादिवशी 'माहितीचा अधिकार' या विषयावर विविध उपक्रमाचे आयोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे व इतर शैक्षणिक संस्थांमध्ये तसेच स्वयंसेवी संस्थांतर्फे जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन व्हावे. माहितीचा अधिकार या विषयावर आधारित विविध उपक्रमाचे आयोजन करुन जनतेमध्ये जनजागृती करण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पोळ यांनी केले आहे.

# विविध मागण्यांसाठी शिक्षकांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

दैनिक आपला विदर्भ







**बुलडाणा/प्रतिनिधी :** शिक्षकांचा विविध प्रलंबित मागण्यांसाठी बुलढाणा जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटने वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयावर दि. २५ सप्टेंबर रोजी बेधडक मोर्चा काढण्यात आला. यावेळी शिक्षकांनी आपल्या मागण्याबाबत घोषणा देत सरकारचे लक्ष वेधले.

शिक्षकांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विविध मागण्यांसाठी राज्यभर शिक्षक संघटना आक्रोश मोर्चा काढून सदर मागणी निकाली काढण्याची मागणी करीत आहेत. यामध्ये शासनाने १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द करावा, जुनी पेन्शन योजना लागू करावी, सातव्या वेतन आयोगातील पदवीधर शिक्षकांच्या व वरिष्ठ वेतन श्रेणी घटक शिक्षकांच्या त्रुटीचा विषय मार्गी लावावा, यासह अन्य मागण्या निकाली काढाव्या यासाठी आज दि.२५ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील शिक्षक संघटनांच्या वतीने बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयावर बुलढाणा जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटनेच्या वतीने बेधडक मोर्चा काढण्यात आला होता.या मोर्चात हजारो शिक्षक सहभागी झाले होते. यावेळी शिक्षकांनी आपल्या मागण्या निकाली काढण्यासाठी विविध घोषणा देत सरकारचे लक्ष वेधले.

तसेच मागण्यांबाबत जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. तसेच सदर मागण्या दि. २ ऑक्टोबर पर्यंत निकाली न निघाल्यास साखळी उपोषण किंवा बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशाराही यावेळी शिक्षक संघटनेच्या वतीने बुलढाणा जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष मुरली टेकाळे यांनी दिला आहे.

### अन्यथा बेमुदत उपोषण

सरकारने शिक्षकांच्या प्रलंबित समस्या तात्काळ निकाली न काढल्यास दि.२ ऑक्टोबरपासून बेमुदत उपोषण करण्यात येणार आहे. यानंतर झालेल्या परिणामास शासन जबाबदार राहील असा इशाराही जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष मुरली टेकाळे यांनी दिला आहे.